नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २२७ Issue - 227 | वार शुक्रवार दि. ३ जानेवारी २०२५ Blow- Friday Date 3 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मंत्रालयात सर्वसामान्यांच्या प्रवेशावर कठोर निर्बंध

## मंत्रालयातील सुरक्षा व्यवस्थेतील बदलांबाबत उच्चस्तरीय बैठक; घेतले विविध निर्णय

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : मंत्रालयात प्रवेशासाठीची सुरक्षाव्यवस्था अधिक कडेकोट करण्यात येणार असून अभ्यागतांच्या प्रवेशावर कठोर निर्बंध येणार आहेत. अभ्यागतांना ज्या खात्यामध्ये काम आहे, त्याच मजल्यावर प्रवेश मिळणार असून अन्य मजल्यांवर जाता येणार नाही.

मंत्रालयातील सुरक्षाव्यवस्थेतील बदलांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी उच्चस्तरीय बैठक घेतली. मंत्रालयात येणारे नागरिक, अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुलभपणे प्रवेश मिळावा आणि सुरक्षा भक्कम राहावी, यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करण्यात यावा, असे निर्देश फडणवीस यांनी दिले.

महायुती सरकार सत्तेवर आल्यानंतर मंत्रालयाच्या सुरक्षेचा नव्याने आढावा घेतला जात असून फडणवीस यांनी उच्चस्तरीय बैठक आयोजित केली होती. त्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. इक्बालसिंग चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती आदी उपस्थित होते. राज्यभरातून कामे घेऊन नागरिक मंत्रालयात येतात आणि खूप गर्दी होते. या वाढत्या गर्दीचा सुरक्षा व्यवस्थेवर ताण पडतो. त्यामुळे अभ्यागतांसह कर्मचाऱ्यांचा प्रवेश सुलभ होऊन सुरक्षा व्यवस्था चोख करण्यात येणार आहे.

मंत्रालयात प्रवेश करण्यासाठीचा पास देताना अभ्यागताचे छायाचित्र काढले जाते. आता इमारतीच्या प्रवेशद्वारातही सुरक्षा अडथळे लावण्यात आले असून प्रत्येक व्यक्ती कॅमेरामध्ये दिसेल आणि त्याची आ‍ळख, छायाचित्र व नाव बाजूला असलेल्या मॉनिटरवर येईल व आ‍ळख पटल्यावरच त्याला प्रवेश खुला होईल अशी व्यवस्था प्रत्येक मजल्यावर उभारण्यात येणार असून ज्या मजल्यावर नागरिकांचे काम आहे, त्याला त्या खात्यासाठीच पास दिला जाईल व अन्य मजल्यांवर जाता येणार नाही, अशी यंत्रणा उभारण्यात येत आहे, असे उच्चपदस्थ अधिकाऱ्याने सांगितले.

**मुख्यमंत्र्यांच्या सूचना –**

नागरिकांच्या मंत्रालय प्रवेश ते बाहेर पडण्याची व्यवस्था यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करावा. मंत्रालयातून विधान भवनात कार्यालयीन कामकाजासाठी अधिकारी व कर्मचारी ये-जा करतात. अधिवेशन काळात ही वर्दळ वाढते. या सर्व ठिकाणी कर्मचाऱ्यांना सुरक्षा पास द्यावेत. मंत्रालय ते विधान भवन भुयारी मार्गाचे काम सुरू असून कर्मचाऱ्यांना तेथून प्रवेशाची सोय उपलब्ध करावी. मंत्रालयातून उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न करण्याचे काही प्रकार झाल्यावर काही वर्षांपूर्वी दुसऱ्या मजल्यावर दोरखंडाची जाळी लावण्यात आली. तरीही त्यात उड्या



मारण्याचे प्रसंग घडल्याने सहाव्या मजल्यासह काही मजल्यांवर लोखंडी जाळी बसविण्याचे काम सुरू झाले. हे काम तातडीने पूर्ण करावे. हे काम झाल्यावर दोरखंडाची जाळी काढून टाकण्यात यावी. मंत्रालय प्रवेशद्वारावर सामानाची चोख तपासणी करण्यात यावी. कुठलीही आक्षेपार्ह वस्तू मंत्रालयात येणार नाही, याची दक्षता घ्यावी.

## थोडक्यात...

### रोहित शर्मा सिडनी कसोटीत विश्रांती घेणार; बुमराहकडे नेतृत्वाची धुरा

नवी दिल्ली : रोहित शर्मा ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सिडनीमध्ये होणाऱ्या पाचव्या कसोटी सामन्यात खेळताना दिसणार नाही. गौतम गंभीरने रोहित शर्मा सिडनी कसोटीत खेळणार की नाही, या प्रश्नावर दिलेल्या उत्तरानंतर रोहित शर्माच्या अखेरच्या कसोटी खेळण्याबाबत संभ्रम होता. यानंतर सोशल मीडियावर भारताच्या सराव सत्रादरम्यानचे अनेक व्हीडिओ फोटो समोर आल्याने रोहित शर्मा ही कसोटी खेळेल की नाही म्हणणारे बऱ्याच पोस्ट व्हायरल झाल्या होत्या, पण आता रोहित शर्माने स्वत:चं मोठा निर्णय घेतला असल्याचे समोर आले आहे. रोहितने स्वतःला संघाबाहेर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. रोहितच्या जागी जसप्रीत बुमराह संघाचे नेतृत्व करताना दिसणार आहे. यासह शुबमन गिल पुन्हा एकदा प्लेइंग इलेव्हनचा भाग होईल. तर पाचव्या कसोटीत आकाशदीपच्या जागी प्रसिध कृष्णाला संधी मिळू शकते. रोहितने प्रशिक्षक गौतम गंभीर आणि निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांना त्याची प्लेईंग इलेव्हनमधील निवड रद्द करण्याच्या निर्णयाची माहिती दिली आहे आणि या निर्णयावर या दोघांनी सहमती दर्शवली आहे. रोहितच्या या निर्णयाचा अर्थ असाही होऊ शकतो की मेलबर्नमधील बॉक्सिंग डे कसोटी रोहितची भारतासाठी शेवटची ठरली असावी, कारण यानंतर इंग्लंडच्या दौऱ्यापासून सुरू होणाऱ्या पुढील जागतिक कसोटी चॅम्पियनशिप चक्रामध्ये योजनांमध्ये रोहित शर्मा संघाच्या योजनांचा भाग नसू शकतो.

# मनू भाकेर, डी. गुकेशसह चार खेळाडूंना खेलरत्न

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने आज राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२४ ची घोषणा केली आहे. १७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता राष्ट्रपती भवन येथे आयोजित कार्यक्रमात पुरस्कार विजेत्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. यामध्ये २०२४ च्या ऑलिम्पिकमध्ये दोन पदके जिंकणारी नेमबाज मनू भाकेर, जागतिक बुद्धिबळ चॅम्पियन डी गुकेश, हॉकीपटू हरमनप्रीत सिंग आणि पॅरा अथलीट प्रवीण कुमार या चार क्रीडापटूंना मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे.



दरम्यान, हे पुरस्कार जाहीर होण्यापूर्वी केंद्र सरकारकडून क्रीडा क्षेत्रातील सर्वोत्तम कामगिरीसाठी देण्यात येणाऱ्या ध्यानचंद खेलरत्न पुरस्कारच्या यादीत नेमबाज मनू भाकेरचे नाव नसल्याने मोठा वाद झाला होता. पण, आज जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांमध्ये मनू भाकेरला मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार देण्यात आला आहे.

अवघ्या २२ वर्षांच्या मनू भाकेरने ऑगस्टमध्ये झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत १० मीटर एअर पिस्तूल वैयक्तिक आणि १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक स्पर्धेत दोन कांस्य पदके जिंकली होती. यासह मनू एकाच ऑलिम्पिक स्पर्धेत दोन पदके जिंकणारी स्वतंत्र भारताची पहिली ॲथलीट बनली आहे. दरम्यान याच ऑलिम्पिक स्पर्धेत हमरनप्रीत सिंगने त्याच्या नेतृत्त्वाखाली भारतीय हॉकी संघाला सलग दुसरे कांस्यपदक मिळवून दिले होते.

दुसरीकडे, नुकत्याच झालेल्या जागतिक बुद्धीबळ अजिंक्यपद स्पर्धेचे १८ वर्षांच्या डी गुकेशने जेतेपद पटकावले होते. तो ही स्पर्धा जिंकणारा आतापर्यंतचा सर्वात तरुण बुद्धीबळपटू आहे. याबरोबर त्याने गेल्या वर्षी बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारतीय संघाला ऐतिहासिक सुवर्ण पदक जिंकण्यात मदत केली होती.

पॅरा अथलीट प्रवीण कुमार

२०२४ च्या खेलरत्न पुरस्कार जिंकणाऱ्या खेळाडूंमध्ये चौथे नाव पॅरा अथलीट प्रवीण कुमार याचे आहे. प्रवीण कुमारने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये उच्च उडी या खेळ प्रकारात भारताचे प्रतिनिधीत्व केले होते. त्याला पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये टी ६४ चॅम्पियन म्हणून गैरविण्यात आले होते. ज्या खेळाडूंना गुडघ्याच्या खाली एक किंवा दोन्ही पाय नसतात ते टी ६४ प्रकारच्या खेळात सहभागी होत असतात.

# सरसकट कोणत्याही अर्जाची छाननी होणार नाही : तटकरे

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**



मुंबई : राज्यात निवडणुका संपल्यानंतर नंव सरकार स्थापन झालं आहे. या नव्या सरकारने लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा केला आहे. काही लाभार्थी महिलांना सहा महिन्यांचे हप्ता एकत्रच जमा झाला आहे. परंतु, आता काही लाभार्थी महिला अपात्र ठरण्याची शक्यता आहे. कोणत्याही लाभार्थी महिलेसंदर्भात तक्रार प्राप्त झाली तर, तिच्या अर्जाची छाननी करून छाननी करण्यात येईल. त्यानुसार निकषबाह्य अर्ज भरलेले अर्ज अपात्र करण्याचा निर्णय झाल्याचं महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या. आज मंत्रिमंडळाची बैठक संपल्यानंतर त्या माध्यमांशी बोलत होत्या.

सरसकट कोणत्याही अर्जाची छाननी होणार नाही, असं आदिती तटकरे यांनी स्पष्ट केलं. त्या म्हणाल्या, तक्रारीशिवाय आम्ही कोणत्याही अर्जा छाननी करणार नाही. उत्पन्नात वाढ झाली असेल, अडीच लाखाच्या वर उत्पन्न गेलं असेल तर त्या महिला योजनेसाठी पात्र नाहीत; चारचाकी असलेल्या महिला अपात्र ठरतील; आंतरराज्य विवाह केलेल्या महिला या योजनेस पात्र नाहीत; आधार कार्डवरील नाव बँकेतील नावापेक्षा वेगळं असेल आणि ते लक्षात आणून दिल्यास ती संबंधित महिला अपात्र ठरेल, असं आदिती तटकरे म्हणाल्या. जुलै महिन्यापासून सुरू झालेल्या या योजनेसाठी राज्यातून २ कोटी ६३ लाख अर्ज आले होते. त्यापैकी २ कोटी ४७ लाख अर्ज पात्र ठरले. १२ लाख ८७ हजार बहिणींचे बँक खाते आधार कार्डशी जोडले गेले नव्हते. त्यांना निवडणुकीपूर्वी योजनेचा लाभ मिळाला नाही. दोन कोटी ३४ लाख बहिणींना ऑक्टोबर महिन्यात नोव्हेंबर पर्यंतचे प्रत्येकी १५०० हजार रुपये प्रमाणे साडेसात हजार रुपये बँक खात्यात जमा केले गेले होते. डिसेंबरचा लाभ देण्यासाठी एक हजार ४०० कोटी रुपयांची तरतूद केली. आदिती तटकरे यांच्याकडे महिला विकास विभाग कायम राहिल्याने त्यांनी शनिवारी खातेवाटप झाल्यानंतर डिसेंबर महिन्याचा लाभ देण्याच्या कामाला गती दिली.

आतापर्यंत एकदाही लाभ न मिळालेल्या १२ लाख ८७ हजार बहिणींना सहा महिन्यांचे एकूण नऊ हजार बँक खात्यात जमा करण्यात आले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा महायुती सरकारला विधानसभा निवडणुकीत फायदा झाला.

# देशाच्या आर्थिक स्थितीवरून खरगेंची पंतप्रधान मोदींवर टीका

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी गुरुवारी मोदी सरकारवर जोरदार टीका करत, त्यांनी आर्थिक गोंधळ निर्माण केल्याचा आरोप केला आहे. या गोंधळामुळे सर्वसामान्यांचे जीवन विस्कळीत झाले आहे, असेही ते म्हणाले.

एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये सत्ताधारी भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएवर टीका करताना खरगे म्हणाले की, या अर्थिक गोंधळावर मोदी सरकारकडे कोणताही उपाय नाही. या आर्थिक गोंधळाला तोंड देण्यासाठी मोदी सरकार कुचकामी ठरले आहे.

आपल्या एक्स पोस्टच्या शेवटी मल्लिकार्जून खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टोला लगावत म्हटले की, नरेंद्र मोदी जी, तुमचा नव वर्षाचा संकल्प प्रत्येक नागरिकाचे जीवन उद्ध्वस्त करणाऱ्या जुमलांपेक्षा काही कमी नाही!



आपल्या पोस्टमध्ये मल्लिकार्जून खरगे यांनी ७ आर्थिक निर्देशांकांचा दाखला दिला आहे. ते म्हणाले, सुवर्ण कर्जामध्ये ५० टक्के वाढ झाली आहे. वस्तू आणि सेवांचे एकूण मूल्य गेल्या ८ तिमाहीत मंद झाले असून, कार विक्री ४ वर्षांच्या नीचांकी पातळीवर गेली आहे. गेल्या ५ वर्षांत अभियांत्रिकी, उत्पादन, प्रक्रिया आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील वेतन केवळ ०.८ टक्के वार्षिक दराने वाढले आहे. गेल्या आठ तिमाहीत अन्नधान्य महागाई सरासरी ७.१ टक्के आहे. याचबरोबर जीवनावश्यक वस्तूंवर जीएसटी कर आकारणीमुळे घरगुती बचत कमी होत आहे.

रुपयाने सर्वकालीन नीचांकी पातळी गाठल्यामुळे परदेशी निधीचा प्रवाह मंदावला असून, छोट्या गुंतवणूकदारांचे लाखो कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. संसदेचे हिवाळी अधिवेशन नुकतेच पार पडले. हे अधिवेशन विविध मुद्यांनी गाजले होते. याचबरोबर सत्ताधारी आणि विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाजही स्थगित करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अधिवेशना दरम्यान संसदेत विविध मुद्द्यांवर भाषण करत काँग्रेस आणि गांधी परिवारावर टीका केली होती.

संतोष देशमुख हत्या प्रकरण

### हत्या तपासावर प्रकाश आंबेडकरांची टीका

# देवेंद्र फडणवीस तुमचे पोलीस खाते भ्रष्ट झाले आहे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. या प्रकरणातील काही आरोपी अजूनही फरार आहेत. यामुळे पोलिसांवर सर्वच स्तरातून टीका होत आहे. अशात या संपूर्ण प्रकरणाच्या तपासावर वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी अनेक प्रश्न उपस्थित करत, मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली आहे. यावेळी आंबेडकर यांनी फडणवीसांचे पोलीस खाते पूर्णपणे भ्रष्ट झाल्याचे म्हटले आहे.

सरपंच संतोष देशमुख यांची हत्येतील फरार आरोपी आणि या प्रकरणाच्या तपासावरून प्रकाश आंबेडकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी एक्सवर पोस्ट केली असून, त्यामध्ये ते म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांचे पोलीस यंत्रणेवर अजिबात नियंत्रण नाही.







मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या मृत्यू प्रकरणी पहिल्यांदा स्थानिक पोलिसांनी चौकशी केली. त्यांना देशमुख हत्येप्रकरणी काहीही सापडले नाही. त्यानंतर पोलीस अधिक्षकांनी चौकशी केली, त्यांनाही काही सापडले नाही. त्यानंतर सीआयडीने चौकशी केली, त्यांनाही काही सापडले नाही. आता चौकशीसाठी एसआयटी स्थापन केली आहे. पुढे काय करणार? तर ही केस सीबीआयला देणार!

या पोस्टमध्ये प्रकाश आंबेडकर यांनी पुढे लिहिले आहे की, देवेंद्र फडणवीस तुमचं पोलीस खातं पूर्णपणे भ्रष्ट झाले आहे, हे पहिल्यांदा लक्षात घ्या. नुसत्या कमिट्या स्थापन करून उपयोग नाही. ज्यांनी या प्रकरणाचा तपास योग्य केला नाही, त्यांना विचारा की तपास का झाला नाही? याचे उत्तर नसेल तर त्यांना सेवेतून सरळ निलंबित करा.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग या गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी अपहरण करून निर्घून हत्या करण्यात आली होती.

दरम्यान या प्रकरणातील काही आरोपींना पोलिसांनी अटक केली असून, यातील काही आरोपी अजूनही फरार आहेत.

यामुळे सरकारसह पोलिसांवर प्रचंड मोठ्या प्रमाणात टीका होत आहे. दरम्यान या प्रकरणी सर्वप्रथम स्थानिक पोलिसांनी, त्यानंतर पोलीस अधिक्षकांनी व पुढे सीआयडीने चौकशी केली, पण यामधून अद्याप ठोस असे काहीही समोर आलेले नाही.

# अजित पवार मंत्रिमंडळ बैठकीला गैरहजर, तात्काळ पदभार स्वीकारा; मंत्र्यांना मुख्यमंत्र्यांचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : खातेवाटपानंतर राज्य मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार हे उपस्थित नव्हते. दुसरीकडे, काही मंत्र्यांनी अद्याप पदभार स्वीकारलेला नसल्याने तात्काळ पदभार स्वीकारावा, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्र्यांना केली. काही मंत्र्यांनी दालनात प्रवेश करताना पूजाअर्चा गुरुवारी आयोजित केली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार हे सध्या परदेशात असून, ते शनिवारी भारतात परतणार आहेत. यामुळे अजितदादा खातेवाटपानंतर झालेल्या मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीला अनुपस्थित होते. दत्ता भरणे वगळता राष्ट्रवादीचे अन्य मंत्री बैठकीला उपस्थित होते.

खातेवाटप होऊन दहा दिवस झाले तरी काही मंत्र्यांनी अद्यापही पदभार स्वीकारलेला नाही. अशा मंत्र्यांनी तात्काळ पदभार स्वीकारावा अशी सूचना फडणवीस यांनी मंत्र्यांना केली. काही मंत्र्यांच्या दालनाची डागडुजी युद्धपातळीवर चालू आहेत. दालने तयार नसल्याने काही मंत्र्यांनी पदभार स्वीकारण्याचे टाळले आहे. गुरुवारी मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी अतुल सावे, गुलाबराव पाटील, आशिष जैस्वाल आणि माधुरी मिसाळ या मंत्र्यांनी पदभार घेतला. यावेळी काही मंत्र्यांच्या दालनात पूजाअर्चा आयोजित करण्यात आली होती. दत्ता भरणे व योगेश कदम या दोघांनी अद्यापही पदभार स्वीकारलेला नसल्याचे सांगण्यात आले. 'मी नाराज नाही. मला मिळालेले क्रीडा, युवक कल्याण आणि अल्पसंख्याक विकास खाते बदलून देण्याची मागणी पक्ष नेतृत्वाकडे केलेली नाही. पुढील आठवड्यात मंत्रीपदाचा पदभार स्वीकारणार आहे, असे दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले. भरणे नाराज असल्याने त्यांनी पदभार स्वीकारला नसल्याची चर्चा होती. पण भरणे यांनी त्याचा इन्कार केला. मी परदेशात गेल्याने पदभार स्वीकारला नव्हता, असेही त्यांनी सांगितले. इंदापूरमध्ये गुरुवारी माझ्या कार्यकर्त्याच्या घरी लग्न होते. त्यामुळे मी लग्नाला उपस्थित राहिलो.

## संपादकीय....

# दोलायमान परिस्थिती

काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी गुरुवारी मोदी सरकारवर जोरदार टीका करत, त्यांनी आर्थिक गोंधळ निर्माण केल्याचा आरोप केला आहे. या गोंधळामुळे सर्वसामान्यांचे जीवन विस्कळीत झाले आहे, असेही ते म्हणाले. एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये सत्ताधारी भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएवर टीका करताना खरगे म्हणाले की, या अर्थिक गोंधळावर मोदी सरकारकडे कोणताही उपाय नाही. या आर्थिक गोंधळाला तोंड देण्यासाठी मोदी सरकार कुचकामी ठरले आहे. आपल्या एक्स पोस्टच्या शेवटी मल्लिकार्जून खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टोला लगावत म्हटले की, नरेंद्र मोदी जी, तुमचा नव वर्षाचा संकल्प प्रत्येक नागरिकाचे जीवन उद्ध्वस्त करणाऱ्या जुमलांपेक्षा काही कमी नाही! आपल्या पोस्टमध्ये मल्लिकार्जून खरगे यांनी ७ आर्थिक निर्देशांकांचा दाखला दिला आहे. ते म्हणाले, सुवर्ण कर्जामध्ये ५० टक्के वाढ झाली आहे. वस्तू आणि सेवांचे एकूण मूल्य गेल्या ८ तिमाहीत मंद झाले असून, कार विक्री ४ वर्षांच्या नीचांकी पातळीवर गेली आहे. गेल्या ५ वर्षांत अभियांत्रिकी, उत्पादन, प्रक्रिया आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील वेतन केवळ ०.८ टक्के वार्षिक दराने वाढले आहे. गेल्या आठ तिमाहीत अन्नधान्य महागाई सरासरी ७.१ टक्के आहे. याचबरोबर जीवनावश्यक वस्तूंवर जीएसटी कर आकारणीमुळे घरगुती बचत कमी होत आहे. रुपयाने सर्वकालीन नीचांकी पातळी गाठल्यामुळे परदेशी निधीचा प्रवाह मंदावला असून, छोट्या गुंतवणूकदारांचे लाखो कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. संसदेचे हिवाळी अधिवेशन नुकतेच पार पडले. हे अधिवेशन विविध मुद्यांनी गाजले होते. याचबरोबर सत्ताधारी आणि विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाजही स्थगित करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अधिवेशना दरम्यान संसदेत विविध मुद्द्यांवर भाषण करत काँग्रेस आणि गांधी परिवारावर टीका केली होती. यावर राज्यसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रत्युत्तर दिले होते.

# करारी बाणा जपणारी सावित्रीबाई !!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ज्या काळात स्त्रीला समाजात मानाचे स्थान मिळत नव्हते, शिक्षणापासुन आणि स्वातंत्र्यापासुन दूर ठेवून स्त्रीला परावलंबी आणि परतंत्र दुर्लक्षित केले जात होते, त्या काळात सावित्रीबाईचा जन्म झाला. पुढे मात्र क्रांतिज्योती सावित्रीबाईना जोतिबा फुले यांचा उदार दृष्टीकोण त्यांच्या ठायी असल्याने स्वत:चे व्यक्तिमत्व घडविण्याची संधी त्यांना प्राप्त झाली, हे त्यांचे अहोभाग्य म्हणावे लागेल. ज्योतिबा सारखे व्यक्तिमत्व त्यांच्या जीवनी आलं आणि आयुष्यच पार बदलून गेले.

सावित्रीबाईना बालपणी घरच्यांकडून शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळणे त्या काळात शक्यच नव्हते, कारण त्यासाठी मनुवाद्यांचे वर्चस्व होणे, स्त्रीला शिक्षणापासुन मज्जाव होता. सावित्रीबाईना मात्र बालवयापासून शिकावे असे मनोमन वाटत होते. ते त्यांनी विवाह झाल्यानंतर साध्य केले, ही त्यांच्या जमेची बाजू झाली. सावित्रीबाई आणि ज्योतिबा यांना अपत्य नव्हते. त्यांनी यशवंतरावांच्या मुलाला आणि त्यांच्या विधवा आईला आपल्या घरी आश्रय दिला. पुढे सावित्रीबाईनी ज्योतिबांशी विचार विनिमय करुन यशवंताला दत्तक घेतले. यशवंताच्या खऱ्या आईला सावित्रीबाईनी अत्यंत प्रेमाने वागविले, ही त्यांच्या मनाच्या मोठेपणाची साक्ष होती. ज्या जोतिबांच्या मनाने स्त्रीयांनी शिकावे असा विचार केलेला असल्यामुळे त्यांनी आपल्या पत्नीपासूनच स्त्री शिक्षणाला आरंभ केला होता. जोतिबांच्या वडिलांनी आपल्या मुलाच्या शिक्षणाबाबत विरोध प्रकट केला होता. तिथे सुनेच्या शिक्षणाला ते नकार देतील यात काय आश्चर्य, पण ज्योतिबांचा मुलीसाठी शाळा काढण्याचा विचार निश्चित झाला होता. त्यामुळे त्याचा आरंभ त्यांनी आपल्या पत्नीपासून म्हणजे सावित्रीबाईपासुनच केला. शेतात काम करतानाच झाडाखाली बसून काळया मातीत अक्षरे गिरवत सावित्रीबाई शिकू लागल्या. यामध्ये थोडी प्रगती झाल्यावर त्यांनी एका सरकारी शाळेत प्रवेश घेऊन पुढचे शिक्षण चालू ठेवले. त्यामुळे स्त्री शिक्षणाला चालना देण्याचे धैर्य त्यांनी दाखविले. त्या दरम्यान स्त्रीला शिक्षणापासुन वंचित ठेवता कामा नये.

असा निर्धार करुन १४ जानेवारी १८४८ साली ज्योतिबांनी पुण्यातील बुधवारपेठेत भिडयांच्या वाडयात मुलींची पहिली शाळा काढली. त्यात सावित्रीबाई पहिल्या शिक्षिका म्हणुन कार्यरत होत्या. सनातनी पुण्यात हलकल्लोळ माजवित होते. 'कलीयुग आले, धर्म बुडाला, कली मातला', अशी सनातन्यांनी बोंब करावयास सुरवात केली. त्याला न जुमानता बेडरपणे या सर्व गोष्टींना त्यांना काडीचीही किंमत दिली नाही. कारण त्यांना हे माहित होते की, चांगल्या कामाची उपेक्षा, अवहेलना होते नंतर त्याबद्दल कुतुहल निर्माण होते, व शेवटी त्याचा स्विकार होतो, तसे या कार्याचे झाले. पण मुलींना शिकवायचे धाडस करायला कुणी शिक्षक पुढे येईना. तेव्हा सावित्रीबाई शाळेत जाऊन मुलींना शिकवू लागल्या. सोबत त्यांची सहकारी फातिमा शेख यांनी सुध्दा त्यांच्या समवेत बरेच सहकार्य करुन त्यांच्या पाठीशी खंबीर उभ्या राहिल्या, तेही निरधास्तपणे. बायकांनी शिकणे हे महापाप आणि त्यांना शिकवणे हे तर महाभयंकर पाप असे त्याकाळी सर्वच समाज समजत असल्याने कसलीही तमा न बाळगता धाडसाने सावित्रीबाई शाळेत मुलींना शिकवायला जाऊ लागल्या.

पुण्यातील अतिकर्मठ ब्राम्हण लोक त्यांच्यावर दगड, शेण, चिखल वगैरे फेकीत पण सावित्रीबाईनी या सर्व छळाला शांतपणे तोंड देऊन मुलींना शिक्षण देण्याचे कार्य अव्याहत चालू ठेवले. सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले यांनी नंतर दोन-तीन शाळा काढल्या अशावेळी शिक्षकांची गरज भासू लागली स्त्री शिक्षिका मिळणे कठिणच होते. अशावेळी उस्मान शेख यांच्या भगिनी फातीमा शेख यांनी सावित्रीबाई समवेत शिक्षिका म्हणुन उत्तम कार्य केले. उस्मान शेख हे ज्योतिबांचे जीवलग मित्र होते. हे येथे आवर्जून सांगावेसे वाटते. पुणे येथील हे शैक्षणिक कार्य पाहून १८५२ मध्ये इंग्रज सरकारने फुले पती-पत्नींचा मेजर कॅन्डी यांच्या हस्ते जाहीर सत्कार केला आणि शाळांना सरकारी अनुदानही जाहीर केले. भारतातल्या मुलींच्या पहिल्या शाळेतील या पहिल्या शिक्षिकेने आपले शिक्षण देण्याचे व्रत चालूच ठेवले. त्यांची ही सेवाभावी कृती प्रत्येक स्त्रीने आत्मसात करुन त्याची अंमलबजावणी करण्याची गरज आहे आणि ते पूर्णत्वास नेणे प्रत्येक स्त्रीचे कर्तव्य आहे.



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

पण हे सर्व त्या पतीच्या पावलावर पाऊल टाकून अंधपणे करीत नव्हत्या. तर त्या कार्यावर त्यांची अगाध निष्ठा होती. म्हणून पती निधनानंतरही त्यांनी सत्यशोधक समाजाचे समता आंदोलन पुढे चालू ठेवले. सावित्रीबाईंनी तेव्हा त्यांच्या ठायी असणाऱ्या कविमनाला रुचलेल्या कविता आणि अभंग शब्दबध्दही केले. १८५४ साली त्यांचा हा काव्यसंग्रह प्रसिध्द झाला, त्यात त्यांनी आपल्या कवितांमधुन स्त्री, शुद्र, अतिशुद्रासाठी शिक्षणासाठी मोल, महत्व तत्ववेत्याला शोभेल अशा शब्दामधुन साध्या आणि सोप्या पध्दतीने सांगीतले आहे. 'शुद्राचे दुखणे' या काव्यातून मनुष्यत्वासाठी शिक्षणाचे महत्व दिले आहे. ते अधोरेखित करण्याची गरज आहे.

**दोन हजार वर्षाचे शुद्राचे दुखणे लागले**
**ब्राम्हविहित सेवेचे-भूदेवांनी पछाडले**
**अवस्था पाहुनी त्यांची हाच शब्द मनी उठे**
**सुलभ मार्ग कोणता काय विचारे बुध्दीही आटे**
**खाली शुद्रांना सांगण्याजोगा आहे शिक्षण मार्ग हा**
**शिक्षणाने मनुष्यत्व पशुत्व हाटते पहा**

समाजातल्या दीन-दलितांना मायेने जवळ करणाऱ्या स्त्रियांना शिक्षण मिळावे म्हणुन धडपडणाऱ्या सावित्रीबाई खऱ्या अर्थाने सहचारिणी म्हणुन शोभल्या. त्यांनी आपल्या पतीच्या महान कार्याचा गौरव काव्यबध्द केला. त्यात कृतज्ञभाव आणि पती ज्योतिबा बद्दल आदर व्यक्त करण्यात आला. काव्य लेखना प्रमाणेच त्यांनी गृहीणी या मासीकात लेखही लिहीलेत त्यांच्या लिखानांना अनुभवाचा भक्कम आधार असल्याने ते लेखनही परिणाम कारक ठरले.

सावित्रीबाईनी जोतिबांच्या सर्व कार्यात हिरीरीने भाग घेतला होता. दोघांनी शिकावे समाजातील अस्पृश्यास्पृश्यता नष्ट व्हावी, अनाथांना आश्रय मिळावा ही त्यांची कार्यक्षेत्रे त्यांच्या श्रध्देने प्रभावी झाली. सामाजिक कार्यात पुढाकार घेणे, हे त्यांचे ध्येय होते. त्यामुळेच १८७६-७७ मधल्या दुष्काळात प्लेगची भयंकर साथ आली असतांना त्यांनी आपल्या स्वत:च्या प्रकृतीचीही पर्वा न करता प्लेगची लागण झालेल्यासाठी काम केले. दुर्दैवाने त्या स्वत:च प्लेगच्या भीषण रोगाने पछाडल्या आणि अशातच त्यांचे निंधन झाले.

महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून सावित्रीबाई फुले ओळखल्या जातात. जात आणि लिंगावर आधारित भेदभाव आणि अन्यायकारक वागणूक नाहीशी करण्यासाठी त्यांनी काम केले. फुले यांनी विधवांचे होणारे केशवपन थांबवण्यासाठी पुण्यात न्हाव्यांचा संप घडवून आणला होता. त्या एक लेखिका देखील होत्या, त्यांनी मराठी भाषेत विपुल लेखन केले आहे. १० मार्च १९९८ रोजी भारत सरकारने सावित्रीबाई फुले यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट प्रसिद्ध केले. २०१५ मध्ये पुणे विद्यापीठाचे नामकरण 'सावित्रीबाई फुले पूणे विद्यापीठ' असे करण्यात आले.

# स्व मधुकरराव खंडारे यांच्यासारखी माणसं चांगल्या कार्यामळे हृदयाच्या स्पंदनात ऋतून बसतात : बाल व्याख्याती प्रांजली जाधव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : साखरखेर्डा येथे आयोजित स्वर्गीय मधुकरराव खंडारे यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त तसेच सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त व अर्जुन गवई यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित विविध क्षेत्रात काम करत असलेल्या नागरिकांचा भव्य सत्कार व पुरस्कार सोहळा पार पडला ' खऱ्या अर्थाने हा पुरस्कार सोहळा गाजवला तो चिमुरड्या बाल व्याख्याती कुमारी प्रांजली प्रशांत जाधव हिने ,स्वर्गीय मधुकरराव खंडारे यांच्या आठवणींना व कार्यांना तिने आपल्या वाणीतून वाट मोकळी करून दिली.

यावेळी उपस्थित असलेले क्रांतीकारी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर प्रवीण गीते उपस्थित मान्यवर यावेळी भारावून गेले ,एवढी कुमारी प्रांजली आपल्या भाषणात म्हणाली की स्व मधुकरराव खंडारे हे अत्यंत हलकीच्या परिस्थितीतून वर आलेले एक आंबेडकरी चळवळीचे खंबीर नेतृत्व होते , समाजासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले बाबासाहेबांनी सांगितले प्रमाणे शिका संघटित व्हा व संघर्ष करा या मुल मंत्र प्रमाणे त्यांनी आलेल्या परिस्थितीशी खऱ्या अर्थाने त्यांनी संघर्ष केला, भास्कर जाधव व मधुकर खंडारे सामाजिक वनीकरण मध्ये नोकरीला होते देशाच्या पर्यावरणाचा समतोल राखत होते झाडांची काळजी घेत होते देखभाल करत होते आलेल्या तुटपुंज्या पगारावर असते आपला उदरनिर्वाह त्यावेळी करत असत ,मधुकरराव खंडारे यांनी खूप मोठा जीवनामध्ये संघर्ष केला कधी मागे म्हटले नाही. बाबासाहेबांच्या कायद्यानुसार ते काम करत असत ,लोक विनाकारण कोणाचं असंच नाव घेत नाही परंतु काही माणसे विसरता येत नाही 'त्यातलेच एक व्यक्तिमत्व म्हणजेच स्वर्गीय मधुकरराव खंडारे होय अशी माणसे हृदयाच्या स्पंदनामध्ये रुतून बसतात ,त्याचबरोबर अजून गवई या देशावर लढणारे सैनिक असून त्यांचं कार्य सुद्धा खूप मोठी आहे अशी सांगितले 'समाजामध्ये बदल घडून आणण्याची खूप मोठी ताकद स्वर्गीय मधुकरराव खंडारे तसेच अर्जुनराव गवई यांच्यामध्ये आहे

अशी सुद्धा कुमारी प्रांजली हिने सांगितले 'व शेवटी सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करून लाविला टिळा तिने शिक्षणाचा 'लावीला लळा तिने शिक्षणाचा 'ती शिक्षिका एक होती ' झेलल्या रुढीच्या झळा जिने , क्रांती तिची नेक होती , अशी सुद्धा यावेळी प्रांजली प्रशांत जाधव यांनी सांगितले तिचे या भाषणाचे सर्वत्र कौतुक होत आहे '





# जि. प. प्राथमिक शाळा पिंपळस रामाचे येथील खेळांडूची तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेसाठी निवड





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : सायखेडा बीटस्तरीय जिल्हा परिषद अध्यक्ष चषक स्पर्धा जनता विद्यालय करंजगाव येथे शिक्षण विस्तार अधिकारी कैलास बोरसे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडल्या. या स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद शाळा पिंपळस रामाचे या शाळेने घवघवीत यश संपादन केले.

पिंपळस शाळेने खालीलप्रमाणे यश संपादन करून विजेत्या स्पर्धकांची तालुकास्तरासाठी निवड झाली

१) वैयक्तीक नृत्य,विरा ज्ञानेश्वर महाजन( प्रथम क्रमांक), समूह गायन मोठा गट व्दितीय क्रमांक,३)वैयक्तीक नृत्य,सिद्धी दत्तात्रय शिंदे,तृतीय क्रमांक,४) समूह गायन,लहान गट व्दितीय,५) बुद्धिबळ ,आर्यन गांगुर्डे - प्रथम क्रमांक,६) वक्तृत्व स्पर्धा ,आरती दीपक माळी,द्वितीय क्रमांक ७) समूह नृत्य मोठा गट ,प्रथम क्रमांक,८) चित्रकला लहान गट वेदांती डांगळे (प्रथम क्रमांक),९) चित्रकला स्पर्धा मोठा गट भूमी संतोष डांगळे ,प्रथम क्रमांक,१०) स्पेलिंग बी,साई त्रिभुवन,द्वितीय क्रमांक११)खो खो मुले मोठा गट (प्रथम क्रमांक) -

सर्व यशस्वी स्पर्धकांचे सरपंच उपसरपंच सर्व ग्रामपालिका सदस्य तसेच शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उपाध्यक्ष व सर्व सदस्य यांच्या वतीने अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

**संबंधित डॉक्टराला सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले**

**चौकशी समितीचा अहवाल प्राप्त होताच योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन**

# डॉक्टराचा हलगर्जीपणामुळे महिलेचा मृत्यू; नवेगांवबांध येथील ग्रामीण रुग्णालय समोर प्रेत ठेवून ग्रामस्थांनी केला ठिय्या आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बोडगांव देवी : नवेगावबांध येथील ग्रामीण रुग्णालयात प्रसूती दरम्यान डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे एका महिलेचा २५ दिवसाचे उपचारा दरम्यान नागपुर मेडीकल मधे ३१ जानेवारी ला मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. त्यानंतर मृत महिलेचे प्रेत नातेवाईकांनी नवेगावबांध ग्रामीण रुग्णालया समोर ठेवुन आंदोलन केले.त्यानंतर संबधीत वरिष्ठ अधिकारी यांनी दिलेल्या न्यायाच्या आश्वासनानंतर १ जानेवारीला सांयकाळी शोकाकुल वातावरणात व चोख पोलीस बंदोबस्तात अंत्यसंस्कार करण्यात आले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की,तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय नवेगाव बांध येथे रागिनी अनिल मसराम वय २५ वर्ष ही महिला सहा डिसेंबरला प्रसूतीसाठी दाखल झाली. तेथील डॉक्टरांनी रात्री दहा वाजता सदर महिलेची नार्मल प्रसूती केली. तिने एका गोंडस बाळाला जन्म दिला. प्रसुतीनंतर टाके लावताना चुकीच्या पद्धतीने टाके लावण्यात आल्याने सदर महिलेच्या प्रकृतीत गंभीर परिणाम झाला. लगेच तिला गोंदिया सामान्य रुग्णालय येथे नेण्यात आले. तिथून नागपूरला हलविण्यात आले. नागपूर येथे भरती केल्यानंतर तपासणी अंती टाके लावताना शौचाची नळी फाटल्याने सदर महिलेच्या शरीरात संसर्ग झाल्याने तिच्या किडनी व मेंदू वरती आघात झाल्याचे सांगण्यात आले. तब्बल २५ दिवसानंतर नागपूर मेडिकल मध्ये उपचार घेत असताना ३१ डिसेंबर रोजी सदर महीलेचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर नवेगाव बांध येथील ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांच्या हलगर्जीपणावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष शैलेश जयस्वाल यांच्या नेतृत्वात व आदिवासी संघटना यांच्यावतीने दि. ३१डिसेंबर २०२४ ला नवेगांवबांध ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांविषयी संताप व्यक्त करत मोर्चा काढण्यात आला . नवेगाव बांध पोलीस स्टेशन येथे डॉक्टरांविरुद्ध निवेदन देण्यात आले .

संबंधित डॉक्टरावर कारवाई करण्यात यावी व रागिनी मसराम यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्यात यावी असे नमूद केले . मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलनाचा इशारा शिवसेना उबाठाचे जिल्हाध्यक्ष शैलेश जयस्वाल आणि आदिवासी संघटना तर्फे देण्यात आला आहे.

रागिनी मसराम हिचे प्रेत आज दि. १ जानेवारीला ४:०० वाजता ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात ठेवून आदिवासी संघटनांच्या बहुसंख्य महिलांनी ठिय्या आंदोलन करत मय्यत रागिणी मसराम च्या पतीला शासकीय नौकरी, कुटुंबाला २५ लाखाच्या आर्थिक सहाय्य व बाळाच्या संगोपन करता २५ लाखाच्या आर्थिक सहाय्य देण्याची मागणी करत रागीनी मसराम चे प्रेत ग्रामीण रुग्णालयाच्या समोर ठेवून ठिय्या आंदोलन केला.





यावेळी बहुसंख्य महिलांनी डॉक्टरांना निलंबित करा डॉक्टरांना अटक करा आरोग्य विभागाचा निषेध करत मय्यत रागिनी मसराम च्या कुटूंबा ला न्याय द्या अशा पद्धतीचे मागणी करत जोपर्यंत ह्या मागण्यांचे लेखी आश्वासन देत नाही.तोपर्यंत आम्ही प्रेत उचलणार नाही अशी भूमिका आदिवासी महिला संघटनांनी लावून धरली. एक तासापर्यंत कुठल्याही प्रकारचे आरोग्य विभागाचे अधिकारी जिल्ह्यातील यंत्रणाच्या अधिकाऱ्यापैकी हजर झाले नाही. नंतर अर्जुनी मोरगाव तालुक्याचे तहसीलदार अनिरुद्ध कांबळे यांनी या ठिय्या आंदोलनकर्त्यांच्या मागण्यां ऐकून घेतल्या शिष्टमंडळांसोबत चर्चा केली. यामध्ये अर्जुनी मोर.चे एस डी ओ वरूनकुमार सहारे जिल्हा शल्य चिकित्सक गोंदिया, डॉ. जयस्वाल, डॉ. मोहबे, तहसीलदार अनिरुद्ध कांबळे यांनी वरिष्ठांशी चर्चा करून हयगय करणाऱ्या डॉक्टरांना सक्तीच्या रजेवर पाठविले व अहवाल प्राप्त झाल्यानंतर कारवाई करण्याची हमी दिली. तसेच चौकशी समिती गठीत केलेली आहे.

त्या चौकशी समितीचा अहवाल प्राप्त होताच योग्य ती कारवाई केली जाईल व मुख्यमंत्री सहायता निधी मधून जी काही मदत निकषानुसार देता येईल अशी मदत पीडित कुटुंबाला देण्यात येईल.

असे या ठिकाणी सांगितल्यानंतर जमाव शांत झाला आणि जमावाने त्यानंतर प्रेत उचलून अंतिम संस्कार करिता नेण्यात आले. यावेळी कुठल्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये म्हणून चोख पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# महाराष्ट्र राज्य पत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षेत २०२४च्या पदसंख्येत वाढ करावी : आमदार अभिजीत पाटील

## मुंबईत सह्याद्री अतिथीगृहावर आमदार पाटील यांनी भेटून मुख्यमंत्री फडणवीस यांना दिले निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची मुंबईच्या सह्याद्री अतिथीगृह येथे माढाचे आमदार अभिजीत पाटील यांनी भेट घेऊन महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा पुर्व परीक्षा-२०२४ च्या पदसंख्येत वाढ होण्यासंदर्भात निवेदन दिले.

सन २०२४ यावर्षी महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षेअंतर्गत होणारी राज्यसेवा परीक्षा ही वस्तुनिष्ठ पध्दतीची शेवटची परीक्षा असून लाखो विद्यार्थी सदरची परीक्षा त्यांच्यासाठी शेवटची संधी म्हणून पहात आहेत..

सध्या या राज्यसेवा २०२४ साठी शासनाकडून ४५७ पदांची मागणी पत्रे आयोगाला पाठविण्यात आली आहेत. परंतु लाखो विद्यार्थी शेवटची संधी म्हणून प्रयत्न करीत असतांना ही पदसंख्या अपुरी आहे. राज्यसेवा २०२२ साठी ६२३ पर्यंत पदसंख्या वाढवून सरकारने विक्रम केला होता. त्याच पध्दतीने राज्यसेवा २०२४ साठी देखील सर्व विभागांची अतिरिक्त मागणी पत्रे पाठवून पद संख्येत वाढ व्हावी अशी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची मागणी आहे.

राज्यसेवा परीक्षे मधील वर्ग-१ व वर्ग-२ या पदांची एकूण ३५ संवर्ग येतात. त्यामधील १६ संवर्गातील एकाही पदाचा समावेश यावर्षीच्या जाहिराती मध्ये नाही. तसेच उपशिक्षणाधिकारी या पदाच्या ३४७ जागा रिक्त असल्याचे समजते, यातील किमान १०० जागांचा तरी यावर्षीच्या जाहिरातीमध्ये समावेश करण्यात यावा व उर्वरित १५ संवर्गातील पदे देखील वाढवून सदर विद्यार्थ्यांना न्याय देणे गरजेचे आहे.

सध्या राज्यसेवा परीक्षा २०२५ साठी मागणी पत्रे पाठविण्यात यावीत, याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडून सर्व विभागांना पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. परंतु राज्यसेवा २०२४ साठी पुरेशा प्रमाणात मागणी पत्रे पाठविल्या शिवाय २०२५ साठीची प्रक्रिया सुरू करण्यात येऊ नये, ही विनंती आहे.

त्यामुळे राज्यसेवा २०२५ साठी मागणीपत्रे पाठविण्याच्या प्रक्रियेस तात्पूरती स्थगिती देण्यात यावी. तसेच राज्यसेवा २०२४ च्या जाहिरातीसाठी एक अखेरची वेळ सर्व विभागाकडून अतिरिक्त मागणी पत्रे मागवून घेण्याबाबत सामान्य प्रशासनास तसे निर्देश दिले जावे या संदर्भात आमदार अभिजीत पाटील यांनी सविस्तर चर्चा केली.



## थोडक्यात...




### मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात वाहन चालकावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि घटना १८ डिसेंबर रोजी रात्री पावणे अकरा वाजण्याच्या दरम्यान सोरेगाव जवळ घडली.याप्रकरणी अश्वत्था आकाश जाधव (वय-२४,रा.वडार गल्ली,जिल्हा परिषद शाळेजवळ, सोरेगाव) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी यांचे पती आकाश आपण्णा जाधव (वय-२६,रा.वडार गल्ली) हे त्यांच्या ताब्यातील दुचाकी क्रमांक एमएच.१३. ईएल.५३३२ यावरून वरील ठिकाणी जात असताना कॅनल जवळ फिर्यादी यांचे पती चालवत असलेल्या दुचाकीस कोणीतरी अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणाने चालवून फिर्यादी यांच्या पतीस धडक देऊन गंभीर दुखापत होऊन त्यांच्या मृत्यूस कारणीभूत झाला आहे व अपघाताची खबर न देता तेथून पळून गेला आहे. असे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास चव्हाण हे करीत आहे.

### रेल्वे स्टेशन जवळ अपघात; चालकावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : एका अज्ञात दुचाकी वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील दुचाकी निष्काळजीपणाने चालवून फिर्यादी यांच्या वडिलांच्या दुचाकीला राँग साईडने धडक देऊन पळून गेला आहे. त्यामध्ये फिर्यादी यांच्या वडीलास गंभीर दुखापत होण्यास कारणीभूत ठरला आहे. याप्रकरणी फिर्यादी तानाजी अशोक देशमुख (वय-३२,रा.सिटीजन पार्क,विजापूर रोड) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना १२ डिसेंबर रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास रेल्वे स्टेशन येथे घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहेत.

# श्रमसंस्कार शिबिरासाठी स्वयंसेवकाच्या कार्यक्षमतेस प्राधान्य द्यावे : डॉ. राजेंद्र वडजे

## कल्याणशेट्टी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग उद्घाटन कार्यक्रमात प्रतिपादन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिरासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कार्यक्रमाधिकार्यांनी स्वयंसेवकांची निवड करताना श्रम करण्याची तयारी असणाऱ्या कार्यक्षम विद्यार्थी विद्यार्थिनींची निवड करावी असे प्रतिपादन विद्यापीठ रा से यो संचालक डॉ राजेंद्र वडजे यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने आयोजित केलेल्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, कार्यक्रमाधिकारी राजशेखर पवार उपस्थित होते.

प्रारंभी संस्थेचे संस्थापक स्व. पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वर्षभराच्या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर बोलताना डॉ राजेंद्र वडजे म्हणाले की, श्रमसंस्कार शिबिरात अंतर्गत रस्ते करणे, स्वच्छता, वृक्षारोपण, महिला बचत गट, महिलांचे सक्षमीकरण असे विविध कार्यक्रम ग्रामीण भागात घेतली जातात. अशावेळी स्वयंसेवकांची श्रम करण्याची तयारी लागते. म्हणून कार्यक्रमाधिकाऱ्यांनी श्रमाचे संस्कार झालेल्या स्वयंसेवकाची शिबिरासाठी निवड करावी. प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी म्हणाले की, महाविद्यालयाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर करजगी येथे घेण्याचा मानस आहे. त्यावेळी विद्यापीठाच्या निकषानुसार स्वयंसेवकांची निवड केली जाईल, तेथे नागरिकांना विश्वासात घेऊन श्रममूल्यांकित कार्यक्रम राबविले जातील. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन समर्थ पवार यांनी केले तर आभार कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार यांनी मानले. यशस्वीतेसाठी तेजस्वी विभुते, पायल कांबळे यांनी प्रयत्न केले.

### करजगी श्रमसंस्कार शिबिरात अभिनव उपक्रम

**करजगी येथील नागरिक सुधारणावादी आहेत, त्यामुळे तेथे स्वच्छता अभियानाबरोबरच महिलांसाठी आरोग्य शिबिर,वृक्षारोपण, गर्भवती माता व नवजात शिशु संगोपन, ग्रामस्थांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम, पथनाट्य आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्यासाठी कार्यक्षम विद्यार्थ्यांची निवड केली जाईल. असे संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी कार्यक्रमानंतर सांगितले.**

# मातंग समाजाचा वधू-वर मेळावा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


निफाड/प्रतिनिधी : अहिल्या नगर येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही प्रतिबिंब सामाजिक संस्थेच्या वतीने नगर मधील सोना नगर येथे मातंग समाजाच्या विविध संस्था समाजाच्या अनेक सेवा भावी कार्यासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या वधु-वर सुचक मंडळाच्या कार्यकर्त्यांचा लहुरत्न पुरस्काराने गौरव करण्यात आला.

मातंग समाज वधू वर परिचय मेळावा आणि लहुरत्न पुरस्कार सोहळा नगर मधील सोनानगर येथे संपन्न झाला.या मेळाव्यास महाराष्ट्रातुन बहुसंख्य वधू वर आणि पालक यावेळी उपस्थित होते. प्रारभी सर्व महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. वधू वर सुचक मंडळाच्या माध्यमातून सामाजिक सेवा करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी संस्थेच्या वतीने लहुरत्न पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष अर्जुन बोरुडे, प्रमुख पाहुणे प्रा.लक्ष्मण भालेराव, बाळकृष्ण जगधणे, नाशिक चे दिनकर लांडगे, राजु घाडगे कोल्हापूर, मंगल ताई दावणे कोल्हापूर,नामदेवराव चांदणे, विजय वडागळे सुनील भोसले, सुरेश साठे, आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते.

**लहुरत्न पुरस्काराने अनेक मान्यवर सन्मानित**

सदर मेळाव्यास उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष दादू नेटके, संजय मंडलीक, अनिल जगताप, भास्करराव आढांगळे, भरतजी उमाप, नामदेवराव रोकडे प्रा.बाबासाहेब शेलार, शरद अण्णा काळोखे रवींद्र जगताप मेजर राजू शिंदे संजय सकट जालिंदर वाल्हेकर राजू भिसे सुनील सकट, संदीप पारधे, विजय पाचारणे, सुनील पारधे, काळूराम बोरुडे, अरुण बोरुडे, राजु शिंदे, ज्ञानेश्वर जगधने, अरुण डाके, रवींद्र शेलार, अशोक भोसले, गणेश डाके, संजय जगताप, अशोक उमाप, आनंद जगताप, अनिकेत उमाप अक्षय जगताप मार्गदर्शक भगवान जगताप आदिसह अनेकांनी परिश्रम घेतले.





# घाटकोपर डकलाईन येथे एन विभागाच्या वस्ती स्वच्छता योजनेचे तीनतेरा

## वस्ती स्वच्छता योजना असतानाही डकलाईन येथे घाणीचे साम्राज्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : मुंबई महानगर पालिकेने परिसरातील नालेसफाई आणि स्वच्छता गृहाच्या देखभालीसाठी स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान अंतर्गत वस्ती स्वच्छता योजना जाहिर केली.झोपडपट्टीत साफसफाई,घराघरांतून कचऱ्याचे संकलन,छोटी गटारे,सार्वजनिक शौचालये आदींची स्वच्छता करण्याकरिता पालिकेतर्फे ही योजना राबविली जाते.यात लॉटरी पद्धतीने संस्थांची नियुक्ती करून संबंधित संस्थेला वस्ती स्वच्छता योजनेचे कंत्राट देऊन संस्थेला वस्तीच्या स्वच्छतेची जबाबदारी सोपविली जाते.यात पालिका संबंधित संस्थेला दरमहा मानधन अदा करते.संस्थांनी वस्तीच्या स्वच्छतेची सर्व कामे करून घ्यावी,असे या योजनेत अपेक्षित आहे.मात्र मुंबई महानगर पालिकेच्या एन विभागातील घाटकोपर पश्चिम येथील डकलाईन येथे वस्ती स्वच्छता योजना असूनही संबंधित कंत्राटदाराकडून नालेसफाई,कचरा संकलन होत नसल्यामुळे येथील नाले तुंबून त्यातील सर्व घाणीचे पाणी,कचरा रस्त्यावर आल्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणावर घाणीचे साम्राज्य पसरले असून या अस्वच्छतेमुळे स्थानिक नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत,वारंवार याबाबत संबंधित विभागाला तक्रार करूनही हेतुरस्सर याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे नागरिकांची तक्रार आहे.तसेच नालेसफाई होत नसल्यामुळे,अस्वच्छतेमुळे येथील स्थानिक नागरिक,लहान मुले,वयोवृध्द व्यक्ती यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.त्यामुळे याठिकाणी वस्ती स्वच्छता योजनेचे तीनतेरा वाजले असून,मग ही योजना कोणासाठी आहे? नागरिकांसाठी की कंत्राटदारांना खुश करण्यासाठी असा सवाल येथील स्थानिक करत आहेत.

**विठ्ठल चिकुंद्रे यांनी जिल्हाधिकारी यांना दिले निवेदन**

**जिल्हाधिकाऱ्यांची नारंगवाडीला भेट**

# नारंगवाडी येथील शेतकऱ्यांना दिवसा शेतीला वीज चालु करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथे दि. १ जानेवारी रोजी सकाळी ११ वा.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दिनांक २४ डिसेंबर रोजी ऑनलाईन उद्घाटन केलेल्या सोलार प्लांटला धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यानी भेट दिली. उद्घाटन गेलेल्या प्लॉन्टच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवसा लाईट दिली जात आहे का नाही हे पाहण्यासाठी आले होते.

शेतकऱ्यांना विचारले असता दिवसा लाईट मिळाली नाही असे सांगितले.महावितरणच्या कर्मचाऱ्याला विचारले असता नारंगवाडी फिडरला अधिकचा लोड असल्याने ही वीज पोहोचू शकत नसल्याचे अधिकारी यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी यांनी अगोदर एक फिडर चालवण्याचे आदेश दिले आता या पुढे नारंगवाडी येथील सर्व शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळेल असे आदेश ओम्बासे यांनी महावितरण च्या अधिकाऱ्यांना दिले.

**पवनचक्की व सोलार या परिसरात जास्त प्रमाणात उभारले जात असून शेतकऱ्यांना मनोरा टावर उभारणीचे पैसे कुठे कमी कुठे जास्त दिल्याने व या कंपन्या दंडमशाहीचा वापर करून शेतकऱ्यांच्या जमिनीवर मनमानी कारभार करत असल्याचे शेतकरी वर्गात आक्रोश असल्याचा दिसून आला.**

विठ्ठल चिकुंद्रे यांनी निवेदन देऊन जिल्हाधिकारी यांना सर्व हकीगत सांगितली.

यावेळी उमरगा लोहारा तालुक्याचे उपविभागीय अधिकारी गणेश पवार, उमरग्याचे तहसीलदार गोविंद ऐरमे, सरपंच शेखर घंटे, महावितरणचे अधिक्षक अभियंता आडे, कार्यकारी अभियंता काळे, सोलार कंपनीचे राजु मिनीयर, मंडळअधिकारी पी.जी.कोकण, ग्राम सेवक जगदीश जाधव, पोलिसपाटिल हेमंतराव पाटील, उपसरपंच कुमार पवार, नानाराव भोसले, अमोल चव्हाण, लिंबराज सोमवंशी, किशोर सांगवे, संजय पवार, पिंटू जाधव, भारती महाराज, जयहिंद पवार आदी शेतकरी, महावितरणचेअधिकारी कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन विठ्ठल चिंकुद्रे यांनी केले.



# शिंदेंच्या 'त्या' निर्णयाला फडणवीसांकडून स्थगिती

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे सरकारनं घेतलेल्या एका निर्णयाला स्थगिती दिली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळासाठी भाडेतत्त्वावर बस घेण्याचा निर्णय शिंदे सरकारनं घेतला होता. त्यावेळी शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्रिपदासह परिवहन विभागाची जबाबदारी होती. गेल्या सप्टेंबरमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाला फडणवीसांनी स्थगिती दिलेली आहे. या प्रकरणात २८०० कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा आरोप विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंनी केला होता.

महायुती सरकार सत्तेवर आल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सगळ्या खात्यांच्या मंत्र्यांशी चर्चा करत त्यांच्याकडून १०० दिवसांचा प्लान जाणून घेतला. त्यांनी परिवहन विभागाच्या कामकाजाचा आढावा घेत शिंदे यांच्या निर्णयाला स्थगिती दिली. परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी फडणवीसांना प्रेझेंटेशन दिलं.

महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळानं तीन कंपन्यांना नुकतंच हेतू पत्र दिल्याची माहिती अधिकाऱ्यांनी फडणवीसांना दिली. या माध्यमातून १३१० बसेस ३४.७० ते ३५.१० रुपये प्रति किलोमीटर दरानं भाड्यानं घेण्याची तयारी महामंडळानं सुरु केली आहे. यामध्ये इंधन खर्चाचा अंतर्भाव करण्यात आलेला नाही, असा तपशील अधिकाऱ्यांनी दिला. २०२२ मध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळानं ४४ प्रति किलोमीटर दरानं बसेस भाड्यानं घेतल्या होत्या.

